# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२

## (सकाळी ११-०० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**सर्वश्री अंबादास दानवे,** उध्दव ठाकरे, ॲड. अनिल परब, श्री. सुनिल शिंदे, वि.प.स. यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा – (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) –**

"महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर कर्नाटक सरकारकडून महाराष्ट्राबाबत वादग्रस्त विधाने करण्यात येत असणे, त्यावर महाराष्ट्र सरकारची प्रतिक्रिया, सन १९५६ साली झालेली भाषावार प्रांतरचनेमुळे मोठया प्रमाणात मराठी भाषिक जनता गेली ६६ वर्ष विविध मार्गांनी महाराष्ट्रात सामील होण्यासाठी अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करत असणे, कर्नाटक सरकारने पोलिसांच्या मदतीने अनेक खोटे गुन्हे मराठी भाषिकांवर दाखल करण्यात आलेले असणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांना कृषी, पाणी, वीज, रस्ते, शिक्षण आणि आरोग्य आदी संबंधीच्या समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असणे, मराठी भाषेत कोणतेही कागदपत्र न देणे, सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेला स्वतंत्र भारतात दुर्लक्षित घटकासारखे जीवन जगावे लागत असणे, मा. सर्वोच्च न्यायालयात सदर खटला प्रलंबित असतानाही कर्नाटक सरकारने बेळगाववर आपला हक्क सांगण्यासाठी खाजगी संस्थेच्या जागेत सन २००६ पासून अधिवेशन घेण्यास सुरुवात केलेली असणे, राज्यातील मंत्र्यांना व नेत्यांना बेळगावात येण्यास मनाई करण्यात आलेली असणे, काही कर्नाटक संघटनांकडून महाराष्ट्रातील वाहनांनवर दगडफेक करुन दहशतीचे वातावरण निर्माण करणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष परिणामी सीमावर्ती भागातील मराठी भाषिक जनतेमध्ये निर्माण झालेला असंतोष."

अप्रकाशित प्रत

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव :-**

**"२६ डिसेंबर हा दिवस 'वीर बाल दिवस' म्हणून दरवर्षी साजरा करण्याची घोषणा करुन त्याची अंमलबजावणी केल्याबद्दल भारताचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांचे अभिनंदन करण्याबाबतचा प्रस्ताव"**

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**(१) मुख्यमंत्री :**

**(क)** "संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा २०१८-२०१९ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (महामेट्रो) यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** **'मौजे कशेळी, गुंदवली, दापोडे, दिवे (अंजूर), ता. भिवंडी येथे नाल्याच्या दुतर्फा ५० मिटरचे अंतर न सोडता अनधिकृतपणे गोडावूनचे बांधकाम होणे'** या विषयावरील श्री. धनंजय मुंडे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम १०१ अन्वये, लक्षवेधी सूचना क्रमांक १९४ बाबत दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी झालेल्या चर्चेच्या दरम्यान तत्कालीन राज्यमंत्री (नगर विकास) यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :**

**(क)** "डी.वाय.पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे कोल्हापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "सोमय्या विद्याविहार विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "एमआयटी आर्ट, डिझाईन ॲण्ड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, पुणे यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२० २०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड.)** "विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक हिशोब पत्रके" सभागृहासमोर ठेवतील.

असुधारित प्रत

**चार : विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करणे —**

**"दि वाशिम अर्बन को-ऑप बँकेने पी.एम.पॅकेज अंतर्गत केलेल्या आर्थिक अपहाराची चौकशी करणेबाबत"** या विषयावरील श्री अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल.

**पाच : "सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत" तदर्थ समितीचा अहवाल सादर करणे.**

**सहा : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ व मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) — [अनुक्रमांक (१)] —**

**(१) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६ वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

"राज्यातील उद्योग परराज्यात जाऊ नयेत यासाठी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याबाबत."

**(२) श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १२ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"राज्यातील तसेच मुंबई शहर व उपनगरातील दिव्यांगांच्या विशेष शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांच्या विविध मागण्यांबाबत."

**(३) सर्वश्री विलास पोतनीस, सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"मुंबई उपनगरातील धोकादायक इमारतींकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमात व महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास अधिनियमात समान सुधारणा करण्याबाबत."

**(४) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १० वर खनिकर्म मंत्री निवेदन करतील :-**

"गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड खाणीला शासनाने परवानगी देऊनही लॉयड्स मेटल्स अ‍ॅन्ड इंजिनियर्स या कंपनीने अद्यापपर्यंत पोलाद प्रकल्प उभारला नसणे तसेच सदर खाणीतील कॅप्टिव्ह माइन्सचा दर्जा संपुष्टात आल्याबाबत."

अप्रकाशित प्रत

**(५) सर्वश्री सुनिल शिंदे, विलास पोतनीस, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर राज्य उत्पादन शुल्क मंत्री निवेदन करतील :-**

"अंधेरी, मुंबई येथील 'सहारा स्टार' या पंचतारांकित हॉटेलमधील मेन्शन क्लबमध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२२ रोजी ड्राय डे असतानाही मद्यविक्री सुरु असल्याबाबत"

**सात : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२, सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ व मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून सन २०२१-२२ या वर्षात केवळ २४ टक्के विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून तब्बल ७६ टक्के विद्यार्थी अद्यापही आरोग्य तपासणीपासून वंचित राहिले असल्याची बाब प्रजा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने दि. ५ डिसेंबर, २०२२ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालावरून समोर आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून होणारी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी हा विभागाचा सर्वोत्तम उपक्रमांपैकी एक असणे, तरीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या तीन लाख अठरा हजार दोन विद्यार्थ्यांपैकी केवळ ८४ हजार २४७ विद्यार्थ्यांची आजतागायत आरोग्य तपासणी करण्यात आलेली असणे, तसेच सन २०१४ - २०१५ ते सन २०२१-२०२२ दरम्यान शिक्षण विभागाकडून होणाऱ्या आरोग्य तपासणी उपक्रमात ५८ टक्क्यांची घट दिसून आली असणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे आरोग्य तपासणीसाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद असतानाही विद्यार्थ्यांच्या आरोग्याची होत असलेली हेळसांड, कोविड काळानंतर आणि मुंबईत पसरलेल्या विविध साथ रोगांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने असलेली आरोग्य तपासणीची असलेली नितांत आवश्यकता, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी आणि पालकांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित

**(सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ व मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२)] —**

(२) **श्री. जयंत आसगावकर**, नागोराव गाणार, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवत्तेचा दर्जा कमी होत जाणे, अजूनही साडेतीन लाखाहून अधिक मुले शाळाबाह्य असणे, संचमान्यतेचे निकष बदलून गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी-उर्दू, मराठी, समाजशास्त्र विषयांना स्वतंत्र शिक्षक मिळण्याची आवश्यकता असणे, कला-क्रीडा शिक्षकांची पदे पुनर्स्थापित करण्याची आवश्यकता असणे, दुर्गम व मागास भागातील कमी पटसंख्येच्या शाळांना संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, कार्यानुभव विषयांतर्गत संगणक साक्षरतेचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक शाळेत ICT शिक्षक पद निर्माण करण्याची आवश्यकता असणे, शाळेतील अर्धवेळ ग्रंथपाल पदांवरील कार्यरत कर्मचाऱ्यांना विषयभार देऊन पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) किंवा मोठ्या शाळांमध्ये पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) पदाचा संचमान्यतेत समावेश करण्याची आवश्यकता असणे, अशैक्षणिक कामांसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रिक्त पदांवर पाठवण्याची आवश्यकता असणे, अनुकंपा तत्वावरील भरती तत्काळ सुरू करण्याची आवश्यकता असणे, विनाअनुदानित शाळा व तुकड्यांची त्रुटी पूर्तता करून १०० टक्के वेतन सुरू करणे, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने सुरू केलेली नेमणूक रद्द करून कायमस्वरूपी वेतनश्रेणीवर नियुक्ती करण्याची आवश्यकता असणे, या प्रश्नांच्याबाबत तातडीने सोडवणूक न झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही आणि यावर शासनाची प्रतिक्रिया."

**(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (३)] —**

(३) **श्री. अंबादास दानवे**, ॲड.अनिल परब, श्री अभिजित वंजारी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे तुडाळ येथील सर्व्हे नं.१४/१, सव्हे नं.१३/२/१, १६/२, ही जमिन सरकारी अकारीपड असून महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णय दि.२३.१.२०१९ अन्वये शासकीय जमिनीवर लिलाव पद्धतीने खारपट्टा देण्याची तरतूद असणे, मौजे तुडाळ येथील स.नं.ग.नं.१६/१, एकूण क्षेत्र १४.४७.० हेक्टर आर पैकी १.००.० हेक्टर आर या खाणपट्टा जमिनीकरीता दि.३१.३.२०१६ अन्वये मंजूर करण्यात येणे, परंतु लिलाव पद्धतीने खाण धारकाबाबत खनिज खाणपट्टा

अग्रिम प्रत

नुतनीकरणाचे आदेश व्यपगत झालेले असणे, याबाबतची टिपणी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी मंजूर केलेली असून मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे स्वाक्षरीकरीता दि.३१.१२.२०१९ करीता सादर करण्यात येणे, याबाबत मा.अप्पर जिल्हाधिकारी यांनी आजतागायत ती अनिर्णीत ठेवण्यात येणे, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी केलेल्या मोजणीच्या अनुषंगाने खाणधारकाने एकूण १,०६,८८३ ब्रास उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, सदर खाणीमध्ये उत्खननाकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांचेकडील माहे मार्च २०२० पर्यंत विद्युत देयक व होणारा वीज वापर यांचे विवरणपत्र सादर करण्यात येणे यावरून सदर अनधिकृत उत्खनन आजमितीस सुरू असणे, त्यानुषंगाने खाणधारकास दंडात्मक आदेश काढून तात्काळ दंडात्मक रक्कम शासनास जमा करण्याबाबत कळविलेले असणे, मा.जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र जा.क्र.खशा/कात-१/ईटीएस मोजणी/तुडाळ/२०१८, दि.२.०८.२०१८ व पत्र क्र.गौखशा/कात-१/तुडाळ/मा.म.दळवी/अन.उत्खनन/२०२०, दि.१९.०५.२०२० अन्वये सदर प्रकरणी सुनावणी घेण्याकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना प्राधिकृत करण्यात आले असणे, तद्नंतर मा.अप्पर जिल्हाधिकारी रायगड यांजकडील पत्र क्र.गौखशा / कात-१ / तुडाळ / दळवी / अन.उत्खनन/ २०२०, दि.१५.१०.२०२० अन्वये (परिशिष्ट-२४) सदर प्रकरणी या कार्यालयाकडील मूळ संचिकासह उपविभागीय अधिकारी पेण यांच्याकडे वर्ग करण्याबाबत आदेशित केलेले होते. सद्य:स्थितीत सदरचे प्रकरणे या कार्यालयाकडील पत्र दि.२०.११.२०२० अन्वये उपविभागीय अधिकारी, पेण यांचे कार्यालयात वर्ग करण्यात आली असणे, परंतु सदर प्रकरण हे उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्याकडे पुन्हा वर्ग करण्यात येणे, सबब याबाबत कोणताही आदेश न झाल्याने महाराष्ट्र शासनाचा १५ कोटी ३१ लाख ११ हजार ३२५ हून अधिक दंडात्मक रक्कम खाणधारकाने न भरल्याने शासनाचा महसूल वसूली कामी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"धोकादायक म्हणून जाहिर केलेला अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा गोपाळ कृष्ण गोखले पूल पुर्नबांधणीसाठी दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ पासून संपूर्णतः बंद करण्यात आल्यामुळे अभूतपूर्व वाहतूक कोंडीसह परिसरातील नागरिकांना असंख्य गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सदरहू पूलाचे पुर्नबांधणीचे काम युध्दपातळीवर हाती घेऊन लवकरात लवकर पुनर्रचित पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी लोकप्रतिनिधींना केली असणे, सदरहू पूल वाहतूकीसाठी संपूर्णतः बंद केल्यामुळे वाहतुक कोंडीचा परिणाम औषध खरेदी करणारे, शाळकरी-महाविद्यालयीन विद्यार्थी परिसरातील रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना तसेच सर्वसाधारण नागरिकांना होत असल्याने ही कोंडी सुटण्यासाठी शासनाने पर्यायी

अप्रकाशित

उपाययोजना करीत नसणे, सदरहू पूलांच्या पुनर्बांधणीच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात करण्यास शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, या पूलाचे काम पूर्ण होऊन हा पूल वाहतुकीसाठी कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री. सचिन अहिर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरातील माजगाव ताडवाडी लवलेन मुंबई सेंट्रल आग्रीपाडा परळ इत्यादी भागात वसलेल्या बीआयटी चाळी असणे, सदर चाळींमध्ये भाडे करून सोबत पोलीस कर्मचारी तसेच मुंबई महापालिकेचे कामगार वर्षानुवर्षेत राहत असणे, सदर चाळी सुमारे १०० वर्षाच्या असून त्या चाळी मोडकळीस आलेल्या असणे, सदर चाळींचा पुनर्विकास प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असणे प्रत्यक्षात कोणतीच समक्ष कारवाई अद्याप न होणे, शाळेची दुरवस्था झाल्याने तेथील हजारो रहिवासी जीव मुठीत धरून वास्तव्यात असणे, मुंबईतील चाळींचे पुनर्विकास धोरण शासनाने घेतल्याने त्याच गतीवर बीआयटी चाळींचा पुनर्विकास करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत लोकप्रतिनिधीनी रहिवाशांनी शासनाकडे केलेली वारंवार मागणी, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(६) **सर्वश्री अनिकेत तटकरे**, शशिकांत शिंदे, सतिश चव्हाण, अमोल मिटकरी, विक्रम काळे, डॉ. मनिषा कायंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पेण जि.रायगड येथे २८ डिसेंबर, २०१७ रोजी बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकरी समितीने अन्यायाविरोधात वाचा फोडण्यासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन केलेले असणे, या आंदोलनात सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी एकत्र येऊन खरोशी फाटा दरम्यान मुंबई गोवा हायवे रास्ता रोखो आंदोलन केलेले असणे, या आंदोलनात प्रकल्पग्रस्त शेतकरी, आदिवासी बांधव व स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदविलेला असणे, लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन पार पाडण्याची प्रकल्पग्रस्तांनी खबरदारी घेतलेली असणे, मात्र प्रशासनाने बळजबरीने आंदोलन चिरडून प्रकल्पग्रस्तांना अटक करणे, त्यांचेवर गुन्हे दाखल करणे, अन्यायकारक गुन्हे दाखल झाल्याने स्थानिकांमध्ये नाराजी पसरणे, चुकीच्या पध्दतीने दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याविषयी त्यांनी वेळोवेळी लेखी निवेदने देऊनही शासनाने त्याची कोणतीच दखल न घेणे, जवळपास ६५ जणांवर गुन्हे दाखल झालेले असून यामध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचाही समावेश असल्याने स्थानिक गावांमध्ये या विषयी नकारात्मक वातावरण निर्माण झालेले असणे, एकूणच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर

अग्रिम प्रत

चुकीच्या पध्दतीने दाखल झालेले गुन्हे त्वरित मागे घेण्याविषयी वारंवार होत असलेली मागणी, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(७) **श्री. राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अखिल बंजारा समाजाचे तिर्थक्षेत्र असलेले वाशिम जिल्हयातील पोहरादेवी हे स्थान बंजारा समाजासाठी श्रध्दास्थान असणे, पोहरादेवी या ठिकाणी बंजारा समाजातील नागरिक मोठया संख्येत दररोज दर्शनासाठी येत असून या ठिकाणी बंजारा कुंभ घेणे आवश्यक असतांना अखिल भारतीय धर्मजागरण समन्वय या संघटनेद्वारे जानेवारी, २०२३ मध्ये गोद्री ता. जामनेर जिल्हा जळगांव येथे कुंभमेळयाचे आयोजन करण्यात आलेले असणे, शासनाने हिंदुगोर बंजारा व लबाना नायकडा कुंभकरिता पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा व मलनिस्सारण शौचालय व स्नानगृह यासाठी सुमारे ४ कोटीपेक्षा जास्त निधीची मंजूरी दिलेली असून शासनाचे १०० कोटी पेक्षा जास्त निधी खर्च करण्याची तयारी असणे, वास्तविक हिंदु कुंभमेळा अलाहाबाद, नाशिक, हरिद्वार, उज्जैन अशा ठराविकच तीर्थक्षेत्रामध्ये भरविला जात असणे, असे असताना गोद्री जामनेर या ठिकाणची निवड कोणत्या आधारे करण्यात आली तसेच केवळ हिंदु धर्म व्यापक असल्याने हिंदु बंजारा कुंभ आयोजित करुन बंजारा जमाती करिता मर्यादित का ठेवण्यात आला याबाबत जनमानसात होत असलेली चर्चा, शासनाच्या निधीची तरतूद करताना कशाच्या आधारे कामाची निवड केली गेली, गावाची संख्या कमी भौतिक सुविधांसाठी जास्त निधी अशा प्रकारे जनतेच्या पैशाचा गैरवापर केला जात असल्याची नागरिकांमध्ये निर्माण होत असलेली शंका, या प्रकारातून पोहरादेवी या ठिकाणचे महत्व कमी करण्याचे होत असलेले प्रयत्न, सदरच्या कुंभमेळाच्या आयोजनामुळे हिंदू बंजारा असे नवीन नामकरण आयोजकांकडून करण्यात येणे, पोहरादेवी येथे पायाभूत सुविधा स्वच्छतागृह, रस्ते, पिण्याचे पाणी इत्यादीची व्यवस्था होणे गरजेचे असताना जाणीवपूर्वकपणे गोद्री येथे कुंभ भरविण्यात येत असल्याने बंजारा समाज बांधवात निर्माण झालेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री रामराजे नाईक-निंबाळकर,** जयंत पाटील, कपिल पाटील, अनिकेत तटकरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

अप्रकाशित प्रत

"महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ (१९७८ च्या दुरुस्तीसह) च्या प्रशासकीय स्तरावरील अंमलबजावणीमध्ये संदिग्धता असणे, व त्यामुळे सामाजिक, आर्थिक व भौतिक नुकसान होणे, वन व्यवस्थापन, पर्यावरण, शेती सुधारणा व शेतीची कमाल धारणा इत्यादीचा व्यापक दृष्टीकोनातून महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक -२९) राज्यात अंमलबजावणी करण्यास विधीमंडळाने मान्यता दिलेली असणे, सदर कायद्याद्वारे दिनांक ३०.८.१९७५ पासून राज्यातील सर्व खाजगी वने संपादित करण्यात आलेली असणे, वन विभागांतर्गत सदर कायाद्यातील तरतुदींच्या अधीन राहून एका प्रकरणामध्ये निर्णय देणे, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांस शासनाने निलंबित करणे, परंतु सदर प्रकरण न्यायालयात गेले असता न्यायालयाने त्या अधिकाऱ्याचा निर्णय कायम ठेवणे त्याअनुषंगाने महसुल, वन, विधी व न्याय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना उक्त कायद्यातील तरतुदींचा अर्थ न समजल्यामुळे अशा प्रकारची अनेक प्रकरणे न्यायालयाने निकाली काढताना शासनाच्या विरोधात निर्णय दिल्याचे निष्पन्न होणे, यामुळे शासनाच्या विभागातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना या कायद्यातील तरतुदींचा अर्थ समजून घेण्याची नितांत गजर लागणे, तसेच सदर शासकीय अधिकारी आपल्या पदाचे कर्तव्य व्यवस्थित पार पाडत नसल्याने सामान्य जनतेला आपल्या न्यायासाठी न्यायालयात जावे लागत असणे व त्यामुळे अशा बहुतांश प्रकरणामध्ये न्यायालयात शासन प्रतिवादी असणे, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता महाराष्ट्र खाजगी वन प्राधिकरण निर्माण करण्याची मागणी, तसेच खाजगी वन म्हणून शासनाकडे विहीत झालेल्या जमीनीचा रोख मोबदला सध्या प्रचलित असलेल्या कार्यप्रणाली प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून प्राधान्याने अदा करण्याबाबत शासनाने निश्चित करावयाचे ठोस धोरण करण्याची मागणी होणे, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **श्री. रामदास आंबटकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **खनिकर्म मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली, ता. सुरजागड हा लोह प्रकल्प सुरु करण्यात येणे, सदर प्रकल्प जंगलव्याप्त डोंगराळ भागात असून २०० वर्षे पुरेल असा लोह खनिज साठा उपलब्ध असणे, सदर लोह खनिज उत्खनन १ कोटी टन ऐवढा उपलब्ध होणे, सदर प्रकल्प सुरु करण्याकरिता तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या पुढाकारात उभा होणे, त्यातच एटापल्ली तालुक्यातील व परिसरातील बहुतेक ग्रा.प. पेसा क्षेत्रात येत असून मा. प्रधानमंत्री यांनी जल जंगल जमिनीवर स्थानिक

असुधारित प्रत

अधिवासीना रोजगार व अधिकार देण्याचा मानस असल्यामुळे सदर लोह प्रकल्पात स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणे आवश्यक असणे, त्यातच सदर लोह खनिजांचा वाहतुकीमुळे आलापल्ली-आष्टी-गोंडपिपरी रस्त्यांची पुर्णत: दुर्दशा झाली असणे, वास्तविकता करारानुसार रस्ते दुरुस्ती कामे कंपनीद्वारे होणे आवश्यक असणे, त्यातच सदर वाहतुकीमुळे मोठया प्रमाणात शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागणे, त्यामुळे सदर कंपनीद्वारे स्थानिकांना रोजगार उपलब्ध होण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **ॲड. अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वांद्रे (पूर्व ) येथील शासकीय वसाहतीचा पुर्नविकासाचा प्रकल्प अद्याप रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाश्यांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अद्याप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प रखडलेला असणे, परिणामी स्थानिक रहिवाश्यांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, वांद्रे शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालिन विनिदेशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, सदरहू इमारतीचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षाचेच असल्याचे सद्यस्थितीत इमारतीची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतीच्या काही भाग कोसळलेला, तर काही भागांच्या छताचा भाग पडलेला असणे, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सद्यस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरावस्था पाहता व सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुर्नविकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**आठ : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

**- मध्यंतर —**

अग्रिम प्रत

**नऊ : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

(१) **सर्वश्री अंबादास दानवे**, विलास पोतनीस, किशोर दराडे, वि.प.स. यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतलेला असणे, उक्त कार्यक्रमाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी ७५ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देऊनही सदरहू निधी विनावापर पडून असणे, तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन/रुपरेषा निश्चित करण्यासाठी महाविकास आघाडीच्या सरकारने गठीत केलेली मंत्रिमंडळ उपसमिती बरखास्त करुन नविन मंत्रिमंडळ उपसमिती पुर्नगठीत करण्यात आली असणे, परंतू उक्त समितीचे काम अद्याप सुरु नसणे, त्यामुळे मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याबाबात शासनाची उदासिनता दिसून येणे, परिणामी मराठवाडयातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करुन मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमत महोत्सवी वर्ष साजरा करुन त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री प्रविण पोटे-पाटील,** प्रविण दरेकर, निलय नाईक, प्रसाद लाड, रमेश पाटील, राजहंस सिंह, प्रविण दटके, प्रा.राम शिंदे, वि.प.स. यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यात विशेषत: अमरावती, मालेगाव, कोल्हापूर, पालघर जिल्हयात अल्पवयीन मुलींना फूस लाऊन, प्रलोभन दाखवून व काही ना काही मार्गाने आकर्षित करुन लव-जिहादच्या नावाने मुस्लिम मुलांकडून पळवून नेण्याचे प्रकार किंबहुना १८ ते २१ वयोगटातील बऱ्याचशा मुली खोटया भूलथापांना बळी पडून स्वत:हून घरच्यांच्या नकळत पळून जाण्याचे प्रकार मोठया प्रमाणावर निदर्शनास येणे, समोरील व्यक्ती मुस्लिम धर्माची असताना हिंदू धर्मातील नावे धारण करुन हिंदू मुलींना आकर्षित करण्याचे प्रकार निदर्शनास येणे, यात गुंतल्यानंतर कालांतराने पश्चाताप होऊन काही मुलींनी आत्महत्या केल्याचे प्रकार निदर्शनास येणे, जेमतेम १८ वर्षाच्या झालेल्या ज्या मुलींना त्यांच्या भविष्याचा अंदाज नाही अशा मुलींचे आयुष्य उध्वस्त होत असल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकारातील कित्येक मुली शरमेने व पश्चातापाने घरी न परतता अवैध धंद्यात गुंतल्या असल्याची बाब उघडकीस येणे, हिंदू धर्माला कलंकित करणाऱ्या मुस्लिम धर्मातील नराधमांपासून हिंदू मुलींना वाचविण्यासाठी हिंदू विवाह अधिनियमात सुधारणा करुन १८ ते २१ वर्ष वयादरम्यानच्या मुलींचे विवाह पालकांच्या संमतीने करणे अनिवार्य करण्याची व २१ वर्ष वयानंतरच्या मुलींना स्वेच्छेने विवाह करण्यास मुभा देण्याची आवश्यकता, खाजगी विवाह संस्थांच्या माध्यमातून अशा भूलथापांना हिंदू मुली

अप्रकाशित प्रत

बळी पडत असल्याने विवाह जुळवून लावून देणाऱ्या संस्थांवर बंदी आणण्याची आवश्यकता, असे विवाह उपनिबंधकाकडे एक महिन्याची पूर्वसूचना देऊन व नोंदणी करुन करण्याची आणि अशा विवाहास मुलींच्या आई-वडिलांनी किंवा पालकांनी उपस्थित राहणे अनिवार्य करण्याची आवश्यकता, या प्रकारांना कायमस्वरुपी आळा बसण्यासाठी राज्यात धर्मांतर विरोधी अधिनियम तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० — यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(३)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ — महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ — महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(४)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(५)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ — उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करणे (सुधारणा) विधेयक, २०२२"

**(६)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) विधेयक, २०२२.

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ — महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रकाशित प्रत

**(७)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ — स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ — स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**अकरा : (क)** **(मंगळवार, दिनांक २० डिसेंबर, २०२२, बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२, गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ व मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, सुरेश धस, गोपिचंद पडळकर, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, प्रा. राम शिंदे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री रामराव पाटील, अमरीश पटेल, श्रीकांत भारतीय, प्रविण पोटे-पाटील, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दटके, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्री. राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

"महाविकास आघाडी सरकारच्या ३३ महिन्यांच्या कार्यकाळात विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्रातील मागास भागातील अनेक विकास प्रकल्पांकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, राज्यात विदर्भ, मराठवाडा व कोकणासह उर्वरित अविकसित भागाचा संतुलित विकास होण्याची आवश्यकता, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्रा उद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन इत्यादी शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देऊन अधिकाधिक रोजगार उपलब्ध करणे, कृषीमालावर आधारीत प्रक्रिया उद्योग उभारणे, धानावर प्रक्रिया उद्योग उभारणे, विदर्भ आणि मराठवाड्यातील तिर्थक्षेत्र व पर्यटनस्थळांचे जाळे तयार करून रोजगार निर्मिती वाढविणे, विदर्भातील कापूस उत्पादनावर आधारीत सूत गिरण्या व कापूस उद्योगाला चालना देणे, विदर्भ व मराठवाड्यात खनिज व

अप्रकाशित प्रत

जंगल संपत्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा अधिकाधिक फायदा जनतेला मिळण्याच्या दृष्टीने आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणे, विदर्भातील विशेषत: अमरावती व मेळघाट येथे आधुनिक सोयीसुविधा युक्त रुग्णालयांची निर्मिती करून कुपोषणामुळे होणारे बालकांचे मृत्यू टाळण्याची आवश्यकता, राष्ट्रीयकृत बँकांच्या तुलनेत सहकारी बँकांची जिल्ह्या-जिल्ह्यात सहज उपलब्ध होणारी सेवा विचारात घेता सहकारी बँकांवरचे वाढते निर्बंध शिथील करण्याची आवश्यकता, राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन करून त्यांच्या संवर्धनाकरीता विशेष निधी उपलब्ध करणे व राजे शिवछत्रपतींचा इतिहास पर्यटकांसमोर मांडण्याची आवश्यकता, राज्यातील १२ बलुतेदारांसाठी एमआयडीसीमध्ये कौशल्य विकास केंद्राचे जाळे उभारून ग्रामीण भागातील बलुतेदारांना त्यांच्या व्यवसायांत आयटीआयच्या धर्तीवर तंत्रशिक्षण देऊन त्यांच्या उद्योगात आधुनिकता आणण्याची आवश्यकता, केंद्र शासनाचे नदीजोड प्रकल्प प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची आवश्यकता, विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बारमाही पाणी उपलब्ध करून त्यांच्या उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा अधिक प्रभावी करण्याकरीता या योजनेच्या अटी व निकष शिथील करणे, विदर्भ व मराठवाड्यासह राज्यातील बेरोजगार युवकांची वाढती संख्या विचारात घेता मिहान प्रकल्प व अन्यत्र जड उद्योग, कृषी प्रक्रिया उद्योग, ऑटोमोबाईल प्रकल्प सुरू करण्याची आवश्यकता, राज्यातील सर्व जिल्ह्यांत पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी अधिकाधिक वृक्षलागवड करण्याची आवश्यकता, सन २०२२-२३ हे मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष म्हणून राज्य शासनाच्या वतीने साजरे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**(ख)** **(गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२, शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ व सोमवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२२ व मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब, सर्वश्री विक्रम काळे, सतेज उर्फ बंटी पाटील, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री विलास पोतनीस, अब्दुलाखान दुर्राणी, अभिजीत वंजारी, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अनिकेत तटकरे, राजेश राठोड, सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, वजाहत मिर्झा, जयंत आसगावकर, सचिन अहिर, अरुण लाड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री आमश्या पाडवी, विप्लव बाजोरीया, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अविकसित भागाचा झपाट्याने विकास होण्याच्या दृष्टीने योजनांच्या अंमलबजावणीत सातत्य दाखविण्याची नितांत आवश्यकता असणे, दरवर्षी नागपूर अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्याच्या कृषि, सिंचन, शिक्षण इत्यादी अनुशेषाबाबत चर्चा होणे, तथापि, अनुशेष दूर करण्यासाठी ठोस कार्यवाही न होणे, विदर्भातील मुख्य फळपीक असलेल्या संत्रा पिकासाठी अमरावती जिल्ह्यातील वरुड-मोर्शी तालुक्यात अत्याधुनिक संत्रे प्रक्रिया प्रकल्प स्थापन करण्याच्या निर्णयाची, मराठवाडा व आसपासच्या भागातील मोसंबी पिकाची गुणवत्ता व उत्पादकता वाढविण्याकरिता "सायट्रस इस्टेट" स्थापन करण्याच्या निर्णयाची, औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाणा येथे अंडीपुंज निर्मिती केंद्र निर्माण करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकडे शासनाने विशेष लक्ष देण्याची गरज असणे, विदर्भ व मराठवाड्यातील कापूस व सोयाबीन मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजनेची धडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या काळात अतिवृष्टी, पूर, सततचा पाऊस व अवकाळी पाऊस यामुळे राज्यातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग या पिकांचे तसेच संत्री, मोसंबी, डाळींब, द्राक्ष या फळपिकांचे नुकसान झाले असणे, ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या केलेल्या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलेले असणे, त्याऐवजी तुटपुंजी मदत जाहीर करून अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदतही अद्याप मिळालेली नसणे, सरकारच्या उदासीनतेमुळे पीक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांचे लाखो दावे नाकारुन केलेली फसवणूक, विदर्भात कापसावर लाला रोगाचा व संत्र्यावर कोळश्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असणे, राज्य व केंद्र सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणांमुळे व मदतीचा हात आखडता घेतल्याने माहे जुलै, २०२२ पासून ६ महिन्यांच्या काळात सुमारे दीड हजार शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपवली असणे, "शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र" ही सरकारची घोषणा हवेत विरली असणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या सन २०१५ ते २०२० या कालावधीसाठी एनडीआरएफचे निकष निश्चित केले असताना व सन २०२१ मध्ये निकषात वाढ अपेक्षित असताना २ वर्षांचा काळ उलटून गेल्यानंतरही केंद्र सरकारने निकषात वाढ केली नसणे, परिणामी शेतकऱ्यांना एनडीआरएफ व एसडीआरएफमधून तुटपुंजी मदत मिळत असणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्यास झालेला अक्षम्य विलंब, धान खरेदीत झालेले घोटाळे, यामुळे अनेक शेतकऱ्यांचा धान विक्रीअभावी पडून असणे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड प्रकल्पामुळे आपल्या राज्यातील खनिज प्रक्रिया करण्यासाठी अन्य राज्यात जात असणे, मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात सरकारकडून बेफिकीरी व अनास्था दिसून आलेली असणे, मागील सरकारने केलेल्या कार्यक्रमाचे नियोजन व निधीची तरतूद याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करुन कार्यक्रम अंमलबजावणीत उदासीनता दाखवली असणे,

मुक्तीसंग्राम दिनी महाराष्ट्र शासनामार्फत कोणताही भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन न केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संतापाची लाट पसरली असणे, मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रलंबित प्रश्नांचा तातडीने निपटारा करण्याची आवश्यकता, एम.आय.डी.सी. अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यामुळे संबधित अधिकारी मॅट मध्ये जावून उक्त बदल्या रद्द केल्याने यामध्ये शासनास आलेले अपयश, राज्याच्या इतर भागात होणाऱ्या ९२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या व जमीन वाटपाच्या आदेशाला विद्यमान सरकारने स्थगिती दिल्यामुळे राज्यात येणारे प्रकल्प रखडले असणे, महाराष्ट्राचे उद्योग परराज्यात जाणे हे सरकारवर उद्योग जगताचा विश्वास नसल्याचे स्पष्ट होणे, शासनाच्या उदासिनतमुळे वेदान्त फॉक्सकॉन, टाटा एअर बस, बल्क ड्रग पार्क अश्याप्रकारे बरेच प्रकल्प राज्याबाहेर जाणे, यातून एम.आय.डी.सी च्या उच्चाधिकार समितीची निष्क्रियता दिसून येणे, उद्योग मंत्र्यांनी शासनाचे अपयश लपविण्यासाठी राज्याबाहेर जाणाऱ्या उद्योगाबाबत मागील शासनावर जबाबदारी निश्‍चित करणे, मिहान प्रकल्पात ५५ गुंतवणुकदारांबरोबर करार झाला असताना फक्त ११ कंपन्या कार्यरत झाल्या असणे व फक्त ५९२५ रोजगार निर्मिती झाली असणे, मिहान प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, विदर्भातील बुटीबोरी, मिहान सारख्या औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांची पिछेहाट झालेली असणे, विदर्भ, मराठवाड्यात उद्योग व गुंतवणूक आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, विदर्भ, मराठवाडा, व उर्वरित महाराष्ट्रातील आकांक्षित जिल्ह्यासाठी जलसिंचन सुविधा पुनरुज्जीवीत करण्यासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित केलेला नियतव्यय प्राधान्याने वितरित करण्याची आवश्यकता असणे, वैनगंगा-पैनगंगा प्रकल्पाचा आराखडा मागील सरकारने पूर्ण करुनही या सरकारने सहा महिन्यात काहीही प्रगती न करणे, बळीराजा योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना इत्यादी जलसंपदा विभागाच्या विदर्भातील योजना गेल्या सहा महिन्यात ठप्प होणे, विदर्भातील सिंचनाच्या सर्व प्रशासकीय बाबी या सहा महिन्यात प्रलंबित राहिल्या असणे, राज्यातील ओबीसी, मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या वसतीगृह व शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण झालेला असणे, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अतिदुर्गम भागात विशेषत: विदर्भातील अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर इत्यादी जिल्ह्यात बालमृत्यू व कुपोषणाचे प्रमाण सर्वाधिक असणे, राज्यात महिला व अल्पवयीन मुलीवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, गत नऊ महिन्याच्या कालावधीत महिलांवरील अत्याचारामध्ये २३५ टक्के तर विनयभंगाच्या घटनांमध्ये १७२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे समोर येणे, दिवसेंदिवस गुन्ह्यांमध्ये वाढ होत असतांनाही याबाबत शासन गंभीर नसणे, परिणामी गुन्ह्यांमध्ये होत असलेली वाढ, तसेच गुन्हे निकाली काढण्यास होत असलेला विलंब, वाढत्या गुन्हेगारीस आळा बसण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाने करावयाची

उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ग) **(मंगळवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** चंद्रशेखर बावनकुळे, रामदास आंबटकर, प्रविण दटके, प्रसाद लाड, गोपिचंद पडळकर, प्रा. राम शिंदे, श्री. श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रमेश कराड, नागोराव गाणार, रमेशदादा पाटील, निलय नाईक, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, रामराव पाटील, निरंजन डावखरे, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री सुरेश धस, प्रविण पोटे-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"केंद्र शासनाने पेट्रोल, डिझेलच्या विक्रीकरात कपात केल्यानंतरही मागील सरकारच्या कार्यकाळात राज्य शासनाने अन्य राज्यांप्रमाणे पेट्रोल व डिझेलच्या दरात कपात करण्यात आडमुठे धोरण अवलंबणे, परिणामी राज्यातील गोरगरीब जनतेला महागाईचे चटके सहन करावे लागणे, विद्यमान शासन सत्तेवर येताच पेट्रोल व डिझेलवरील विक्रीकरात कपात करण्यात येणे, मागील सरकारने प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार देण्याची घोषणा सन २०२० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात व २०२१ मध्ये करूनही या घोषणेची अंमलबजावणी न होणे मात्र, विद्यमान शासनाच्या कार्यकाळात शेतकरी हित लक्षात घेऊन रु.५० हजारचा निधी तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला असणे, मागील शासनाच्या काळात सरसकट शेतकऱ्यांची वीज कापण्याची मोहीम राबविण्यात आली असताना विद्यमान शासनाच्या काळात उपमुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापू नये असे आदेश निर्गमित करून शेतकऱ्याचा प्राधान्याने विचार केला असणे, मागील सरकारच्या काळात काही विशिष्ट मतदार संघात निधीचे असमान वाटप करण्यात आले असताना विद्यमान शासनाच्या काळात सर्वांना समान निधी वितरित करण्याचे धोरण आखण्यात येणे, शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या वेतनवाढीचा विचार होण्याची आवश्यकता, सन २००१ च्या पूर्वीची बीपीएड आणि कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबत विचार होण्याची आवश्यकता, म्हाडाकडून पुनर्विकास होणाऱ्या इमारतीतील रहिवाशांना तसेच झोपडीधारकांना विकासकाविरुद्ध महारेरामध्ये अपिल करण्याचा अधिकार देण्याची आवश्यकता, इमारत पुनर्विकास करताना केलेल्या कराराप्रमाणे तेथील भाडेकरुंना पुनर्विकास प्रकल्प पूर्ण होईपर्यंत

अप्रकाशित प्रत

बऱ्याच विकासकांकडून भाडे देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास येणे, पुनर्विकास करावयाच्या इमारतींचा तात्काळ विकास करण्याची आवश्यकता, मुंबईतील नेहरूनगर व टिळक नगर म्हाडा वसाहतीतील पुनर्विकसित इमारतींना १० ते १५ वर्षे उलटूनही अद्याप भोगवाटा प्रमाणपत्र (ओसी) न मिळणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या हद्दीतील जमिनींवरील धारणाधिकार रुपांतरीत करण्याकरीता आकारण्यात येणारे शुल्क जीर्ण इमारतींच्या बाबतीत २.५ टक्के करण्याची आवश्यकता, पीडब्ल्यूआर-२०१९ योजनेतंर्गत एससी, एसटी, एनटी समाजाला दिलेल्या जमिनी फ्रीहोल्ड करण्याकरीता संबंधीत समितीचे गठण तात्काळ होण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे हद्दीतील अनेक वर्षे जुन्या झोपडीधारकांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेत काही पदांवर अधिकारी त्याच-त्याच ठिकाणी दिर्घकाळ कार्यरत असल्याची बाब निदर्शनास येणे, अशा भ्रष्ट अधिकाऱ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मुंबईचा रखडलेला विकास करण्याकरीता नियोजन आराखड्याची वेगाने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**बारा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री विलास पोतनीस,** सुनिल शिंदे, आमश्या पाडवी, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"मुंबई शहरात संसर्गजन्य साथीचा आजार वाढल्यास रुग्णांना उपचारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १२० वर्षे जुन्या कस्तुरबा रुग्णालयावर अवलंबून राहावे लागत असणे, सन १८९२ मध्ये बांधलेल्या कस्तुरबा रुग्णालयात सर्व ् प्रकारच्या संसर्गजन्य आजारांवर उपचार देण्यासाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था असणे, संसर्गजन्य आजार इतर रुग्णांना होऊ नये, याकरिता विशेषत: कस्तुरबा रुग्णालयाची निर्मिती करण्यात आलेली असणे, गत वर्षात कोरोना, स्वाईन फ्ल्यू, कावीळ, मलेरिया, कुष्ठरोग, कांजण्या, गोवर, क्षयरोग, अतिसार व इबो यांसारख्या आजारांनी ग्रस्त रुग्णांवर कस्तुरबा रुग्णालयात प्रभावी उपचार करण्यात आले असणे, तसेच मुंबईसह राज्यात वाढत्या गोवर साथीत बाधित रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयाकडून चांगला उपचार करण्यात येणे, मुंबई शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबई शहरात संसर्गजन्य आजारावर उपचार करण्यासाठी स्वतंत्र रुग्णालय नसल्याने रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयातच उपचारासाठी पाठविण्यात येणे, त्यामुळे कस्तुरबा रुग्णालयावर कामाचा ताण येत असणे, कस्तुरबा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी मुंबईत आणखी एका स्वतंत्र साथीचा रुग्णालय उभारण्याची आवश्यकता असणे, तत्कालीन शासनाच्या काळात मुलुंड येथे विशेष रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या

विचाराधीन असणे, त्यामुळे मुंबई उपनगरात संसर्गजन्य आजारावर उपचार करण्यासाठी कस्तूरबा रुग्णालयाच्या धर्तीवर एक स्वतंत्र रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

(२) **सर्वश्री गोपीचंद पडळकर,** प्रविण दटके, रामराव पाटील, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात सुमारे २७००० ग्रामपंचायतींमध्ये एक लाख ४० हजारांपेक्षा अधिक ग्रामपंचायत कर्मचारी गत अनेक वर्षांपासून अत्यंत अल्प वेतन घेऊन सेवा बजावत असणे, सदर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न कित्येक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असणे, गरीब कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होणे, अधिनियम १९५८ कलम ६१ रद्द करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शंभर टक्के वेतन शासनाकडून मिळावे, वसुलीची अट रद्द करावी तसेच नवीन दराप्रमाणे किमान वेतन थकबाकीसह मिळावे इत्यादी मागण्या पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघाने राज्याचे मा.उपमुख्यमंत्री यांना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिलेले असणे, यास्तव सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सर्व मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २७ डिसेंबर, २०२२.

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अमुद्रित प्रत